# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## तात्काळ
## परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/ मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

संदर्भ -.१. संलग्नता टी-२/११२ दि. १८/०८/२०१८
२. संलग्नता टी-२/१३६ दि. ०४/१०/२०१८

**महोदय/महोदया,**

मा.संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी संदर्भ क्र.उशिसं/अविसो/२०१८/विशि.१/ ८७५१, दि.०१ ऑगस्ट, २०१८ रोजीच्या पत्रान्वये अपंग विद्यार्थ्यांना सोई सुविधा उपलब्ध करून देणेबाबत दाखल केलेल्या जनहित याचिका क्र.१०५/२०१८ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या दि.१८ जुलै, २०१८ च्या आदेशानुसार विद्यापीठाच्या व संलग्नित महाविद्यालयात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास दि.१६/०८/२०१८ पर्यंत सादर करणेबाबत कळविले होते. यानुषंगाने या कार्यालयच्या संदर्भ क्र. संलग्नता टी-२/११२ दि.१८/०८/२०१८ रोजीच्या परिपत्रकान्वये आपल्या महाविद्यालयात अपंग विद्यार्थ्यांसाठी केलेल्या सोयी सुविधांबाबतची माहिती तात्काळ विद्यापीठास सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. तथापि, अद्यापही बहुतांश महाविद्यालयांकडून सदरची माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

दरम्यान , उच्च शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत पुणे यांना संदर्भ क्र. उशिसं/ २०१८/दिव्यांग/ इतिवृत्त/विशी/१६४३८ दि.१७/०९/२०१८, रोजीच्या पत्रान्वये दि.१५/०९/२०१८ रोजी उच्च शिक्षण संचालनालयात दिव्यांगांना विद्यार्थ्यांना महाविद्यालयामध्ये/विद्यापीठामध्ये सोई सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत आयोजित करण्यात आलेल्या बैठकीचे इतिवृत्ताची प्रत आपल्या माहितीसाठी सोबत पाठविले आहे. त्यास अनुसरून आपणास उपरोक्त संदर्भ क्र. २ च्या स्मरणपत्रान्वये सदरची माहिती दि.१०/१०/२०१८ पर्यत सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते.

तथापि, याबाबत आपणास आदेशान्वये पुन:श्च कळविण्यात येते की खालील मुद्दयांची माहिती दि. ११/१०/२०१८ पर्यत affiliation.t2@unishivji.ac.in या ईमेल वर सादर करावी.

१. कलम ४४ नुसार इमारतीमध्ये केंद्र शासनाच्या नॅशनल बिल्डींग कोडप्रमाणे बांधकाम करून व दिव्यांगाना वापरता येतील अशा आवश्यक सोईसुविधा संलग्नीत महाविद्यालयामध्ये अडीच महिन्याच्या आत उपलब्ध करून देणे.
२. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या बैठका घेऊन उपलब्ध योजनांची माहिती देणे, दिव्यांगांना वापरता येऊ शकेल व उपलब्ध होईल अशी वेबसाईट तयार करणे, समान संधी सेल तयार करणे, भौतिक सुविधा तयार करण्याकरिता नियोजन करणे,शैक्षणिक सुविधा उपलब्ध होण्यासाठी व्यवस्था निर्माण करणे.
३. दिव्यांग विद्यार्थ्यांची एकत्रित माहिती सादर करणे.
४. ३ डिसेंबर रोजी जागतिक दिव्यांग दिन साजरा करणे.
५. महाविद्यालयात प्रवेश, परीक्षा दिव्यांगासाठी वेबसाईट तयार करणे. दिव्यांगाचा डाटा बेस तसार करणे. ॲक्सेस ऑडीट करणे. ग्रंथालय उपलब्ध असणे, क्षेत्रावर काम करणारे स्वयंसेवक, दिव्यांग आणि त्यांना उपलब्ध सुविधांची माहिती देणारी समिती गठीत करणे.

आदेशान्वये
उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

संदर्भ क्र. संलग्नता टी-२/ १४५
दिनांक- 11 OCT 2018

E:\Sm\Circular\Circular.docx

महाराष्ट्र शासन

# उच्च शिक्षण संचालनालय

मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१

web:www.dhepune.gov.in. E-Mail director.dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२२११९,२६०५१५१२/२६१३०६२७/२६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६१११११५३

कमांक उशिसं/२०१८/दिव्यांग/इतिवृत्त/विशी दिनांक - १७/९/२०१८

प्रति,

मा. कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे,

**विषय :- दिव्यांगाच्या सोईसुविधाबाबतच्या बैठकीचे इतिवृत्तानुसार कार्यवाही करण्याबाबत**

उपरोक्त विषयानुषंगाने दिनांक १५ सप्टेंबर, २०१८ रोजी दुपारी १२.०० उच्च शिक्षण संचालनालयात बैठक घेण्यात आलेली होती. सदर बैठकीचे इतिवृत्त सोबत जोडले. इतिवृत्तामध्ये नमुद केलेल्या बाबीवर आवश्यक ती कार्यवाही तातडीने करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास विनाविलंब सादर करावा.

हरि। शिंदे

**(हरिभाऊ शिंदे)**
वरिष्ठ प्रशासन अधिकारी
उच्च शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

**दिनांक १५.९.२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता मा. संचालक यांच्या अध्यक्षतेखाली सर्व विद्यापीठे व सलंग्नीत शासकीय व अशासकीय महाविद्यालयांनी दिव्यांग विद्यार्थींना सोईसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.**

सदर बैठकीस उपस्थित असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांची यादी स्वतंत्रपणे जोडली आहे.

सर्व उपस्थितांचे स्वागत करुन बैठकीस सुरुवात करण्यात आली. मा. उच्च न्यायालयात दाखल असलेली जनहित याचिका क्र. १०५/१८ मध्ये दिलेल्या निर्णयानुसार व शासन निर्णय दि. २७ ऑगस्ट, २०१८ मधील निर्देशानुसार दिव्यांग विद्यार्थ्यांना कॉमनरुम, कॅन्टीन, ऑडीटोरीयम, रॅम्प, ग्रंथालय सुविधा, शैक्षणिक सुविधा, पुस्तके, शौचालय इत्यादी सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने व दिव्यांग व्यक्तीचे अधिकार कायदा, २०१६ अन्वये अमंलबजावणी करण्याच्या अनुषंगाने बैठकीत चर्चा झाली.

मुंबई व नागपूर व इतर ठिकाणी हेरीटेज बिल्डींग इमारती आहेत तेथे मुळ इमारतीत /हेरीटेजमध्ये बदल न करता लाकडी रॅम्प तयार करुन दिव्यांगाना सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत मा. संचालक महोदयांनी निर्देशित केले.

कलम ४४ नुसार विद्यापीठे, शासकीय कार्यालये, संलग्नीत शासकीय व अशासकीय महाविद्यालये येथे केंद्र शासनाच्या नॅशनल बिल्डींग कोडप्रमाणे बांधकाम करणे बंधनकारक आहे अन्यथा संबंधिताना बांधकाम पूर्णत्वाचा दाखला देण्यात येऊ नये. प्रस्तुत प्रकरणी तीन महिन्यांच्या आंत उच्च न्यायालयास अंतिम अहवाल सादर करावयाचा आहे. त्याअनुषंगाने दिनांक १५ ऑक्टोबर, २०१८ नंतर पुढील बैठक घेण्याचे निश्चित करण्यात आले.

श्री. काळे, व्यवस्थापक, मालमत्ता, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांनी सर्व विद्यापीठाकडे पाठपुरावा करुन उपलब्ध इमारती, विद्यार्थी रॅम्प सुविधा, व्यवस्था तपासुन एकत्रित अहवाल सादर करावा असे निर्देश संबंधितांना देण्यात आले. सदर कामासाठी श्री. काळे, मालमत्ता व्यवस्थापक यांना नोडल ऑफिसर व श्री. एस. आर. पाटील, कवयत्री बहीणाबाई चौधरी जळगांव विद्यापीठ, जळगांव यांनी एकत्रितपणे काम करण्याबाबत निर्देशित केले.

सर्व विद्यापीठाच्या मालमत्ता व्यवस्थापक (इस्टेट मॅनेजर) यांनी विद्यापीठाच्या अधिनस्त असणा-या सर्व सलंग्नीत शासकीय व अशासकीय महाविद्यालयातील प्राचार्यांची बैठक घेऊन दिव्यांगाबाबतच्या सोईसुविधा, इत्यादीची माहिती महाविद्यालयाकडून घेऊन त्यांचा एकत्रित अहवाल दिनांक १५ ऑक्टोबर, २०१८ च्या पुढील बैठकीत सादर करावा.

सर्व विद्यापीठानी त्यांच्या वार्षिक अदांजपत्रकात दिव्यांगासाठी सोईसुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी विशेष तरतुद करावी असेही सर्वाना निर्देशित करण्यात आले.

सर्व विद्यापीठातील उपलब्ध इमारती व सोईसुविधाचा आढावा घेण्यात आला. कलम ४४ नुसार केंद्र शासनाच्या नॅशनल बिल्डींग कोडप्रमाणे बांधकाम करुन व दिव्यांगाना वापरता येतील अशा आवश्यक सोईसुविधा विद्यापीठ व सलंग्नीत महाविद्यालयामध्ये अडीच महिन्याच्या आंत उपलब्ध करुन देण्याचे निर्देश सर्वाना दिले.

जनहित याचिका क्र.१०५/१८ मध्ये १. दिव्यांगांना सेवेत ५ टक्के आरक्षण, २. कलम ४४ नुसार इमारतीमध्ये शौचालयांची निर्धारीत व्यवस्था, विद्युतपाळणा (लिफ्ट), ३. अभ्यासक्रमाची क्रमीक पुस्तके, ४. तज्ञ शिक्षक व संगणक सुविधा, दृकश्राव्य माध्यमाची सुविधा याबाबत मागणी करण्यात आली होती. अंपगाच्या संवर्गात २१ प्रकारच्या अंपगांचा समावेश आहे. समान संधी सेल स्थापन करणे व उपरोक्त बाबीची कालमर्यादेत पूर्तता करुन तीन महिन्यात न्यायालयामध्ये अहवाल सादर करावयाचा आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ७३ (८) नुसार समान संधी सेलची स्थापना करण्यात यावी. समान संधी सेलमध्ये कुलगूरु वा कुलसचिव याचा समावेश असेल. तसेच सदर सेलमध्ये दिव्यांग विद्यार्थी सदस्य असतील. सदर सेल दिव्यांग विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन द्यावयाच्या सोईसुविधाबाबत ढाचा टरवेल. त्यामध्ये महाविद्यालयात प्रवेश, परीक्षा, दिव्यांगासाठी वेबसाईट तयार करणे. दिव्यांगाचा डाटा बेस तयार करणे. ॲक्सेस ऑडीट करणे. ग्रंथालय उपलब्ध असणे, क्षेत्रावर काम करणारे स्वंयसेवक, दिव्यांग आणि त्यांना

उपलब्ध सुविधाची माहिती देणारी समिती, अभ्यासक्रमाची उपलब्धता, सर्व स्तरावर सुविधा असाव्यात व प्रशिक्षीत मनुष्यबळ उपलब्ध असावे. विद्यार्थ्यांना उपयोगी पडणाऱ्या सुविधा असाव्यात.

दिव्यांगाना सोईसुविधा मिळण्याकरीता कृती आराखडा/योजना तयार करण्याचे ठरले. त्यामध्ये खालील बाबीचा समावेश करण्यात आला.

१. सर्व संबंधित शिक्षकांच्या बैठका घेऊन त्यांना याबाबतची माहिती देणे.
२. स्वंयसेवकाची बैठक घेऊन त्यांना आवश्यक माहिती देऊन कामासाठी उद्युक्त करणे.
३. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या बैठका घेऊन उपलब्ध योजनांची माहिती देणे.
४. दिव्यांगाना वापरता येऊ शकेल व उपलब्ध होईल अशी वेबसाईट तयार करणे.
५. समान संधी सेल तयार करणे.
६. भौतिक सुविधा तयार करण्याकरीता नियोजन करणे.
७. शैक्षणिक सुविधा उपलब्ध होण्यासाठी व्यवस्था निर्माण करणे.
८. विद्यापीठे व सलंग्नीत महाविद्यालयाचे ॲक्सेस ऑडीट करणे.
९. विद्यार्थ्यांचे कृतीसत्र (सेमीनार) आयोजित करणे.
१०. इमारत बांधकाम करताना कलम ४४ नुसार सुविधा निर्माण करणे.
११. दिव्यांग विद्यार्थ्यांची एकत्रित माहिती तयार करणे.
१२. सर्व विद्यापीठानी त्यांच्या अंदाजपत्रक भरीव तरतूद करावी.

वर नमूद केलेल्या सर्व बाबीची पूर्तता एक खास मिशन म्हणुन दिनांक १५ ऑक्टोबर, २०१८ पूर्वी पुर्ण करण्यात यावे. सदर बाबीचा आढावा १५ ऑक्टोबर, २०१८ वा तदनंतर घेण्यात येईल. सदर बैठकीमध्ये सर्व विद्यापीठानी त्यांचा अहवाल सादर करावा.

सर्व विद्यापीठे व टाटा इन्स्टीटयूट ऑफ सोशल सायन्स, मुंबई यांच्यामध्ये दिव्यांगाना उपलब्ध करुन द्यावयाच्या सोई सवलती व त्यांची तपासणी याबाबत सामंजस्य करार (MOU) करण्याबाबत निश्‍चित करण्यात आले. तसेच सदर सामंजस्य करार करण्यासाठी विद्यापीठ कायदा २०१६ मधील कलम ७३ (८) प्रमाणे ऑर्डीनन्स बनविण्याचा मसुदा श्री. एस आर पाटील, कुलसचिव, कवयत्री बहीणाबाई चौधरी जळगांव विद्यापीठ, जळगांव यांनी करण्याचे बैठकीत निश्‍चित करण्यात आले. सामंजस्य कराराचा मसुदा तयार करण्यासाठी श्री. वैशाली कोल्हे , टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्स, मुंबई यांना जबाबदारी देण्यात आली.

सर्व विद्यापीठे व संलग्नीत महाविद्यालये यांनी ३ डिसेंबर रोजी जागतिक दिव्यांग दिन साजरा करण्याचे ठरले.

तदनंतर सर्वांचे आभार मानून बैठक समाप्त करण्यात आली.

*-*-*-*-*-*

(डॉ. धनराज माने)
संचालक, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१

web-www.dhepune.gov.in E-Mail : vishi.dhepune@nic.in
फोन नं.०२०/२६१२२११९,२६०५१५१२,२६१३०६२७,२६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६१११११५३

क्रमांक.उशिसं-२०१८/दिविसो/विशि दिनांक.१५.०९.२०१८

प्रति,
कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे

**विषय : मा.उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्रमांक.१०५/२०१८ मध्ये दिनांक.१८.०७.२०१८ रोजी दिलेल्या आदेशानुसार कार्यवाहीबाबत...**

**संदर्भ :** शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, पुणे येथे दिनांक.१५.०९.२०१८ रोजी झालेली बैठक

विषयांकित प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्रमांक.१०५/२०१८ मध्ये दिनांक.१८.०७.२०१८ रोजी दिलेल्या आदेशानुसार आणि शासन निर्णय दिनांक.२७.०८.२०१८ मध्ये दिलेल्या निर्देशानुसार उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अधिनस्त असणाऱ्या सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित शिक्षण संस्थांमध्ये The Right of Persons With Disabilities Act-२०१६ नुसार दिव्यांग विद्यार्थ्यांना सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, पुणे येथे दिनांक.१५.०९.२०१८ रोजी आयोजित बैठकीमध्ये झालेल्या चर्चेनुसार सेंटर फॉर डिसेबलीटी स्टडीज अँण्ड अॅक्शन, टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई (TISS) या संस्थेशी संलग्नता कराराचा मसुदा (MOU) तयार करणेसाठी श्रीमती वैशाली कोल्हे, सहयोगी प्राध्यापक, सेंटर फॉर डिसेबलीटी स्टडीज अँण्ड अॅक्शन,टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई यांचेशी सपंर्क साधून पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करावी.

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रत,
श्रीमती वैशाली कोल्हे, सहयोगी प्राध्यापक, सेंटर फॉर डिसेबलीटी स्टडीज अँण्ड अॅक्शन,टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई यांना माहिती व उचित कार्यवाहीस्तव.

F:/SAM/Divyang Draft